


# अभीप्सा

अखिल भारतीय पत्रिका

नोव्हेंबर २०२६

वर्ष ५१ अंक ११

# सिद्धीदिन

संपादकीय.....०२
सिद्धीदिनाची पार्श्वभूमी.....०३
सप्तचतुष्टयाची साधना.....१४
सिद्धीदिनाचे महत्त्व.....१८
सिद्धीदिनाच्या आठवणी.....२६
सिद्धीदिनाचा अन्वयार्थ.....३१

## संपादकीय

२४ नोव्हेंबर १९२६ या दिवशी श्रीअरविंदांमध्ये श्रीकृष्णाचे अवतरण झाले. एवढेच नव्हे तर श्रीकृष्ण श्रीअरविंदांच्या देहामध्ये कायमस्वरूपी वास्तव्यास आला आणि इथेच श्रीअरविंदांची वैयक्तिक स्तरावरील साधना सिद्धीस गेली. आणि म्हणून हा दिवस 'सिद्धी दिन' किंवा 'विजय दिन' म्हणून ओळखला जातो.

यानंतर श्रीअरविंदांनी एका अधिक गहन कार्यासाठी म्हणजे, पृथ्वीवर अतिमानसाचे अवतरण घडवण्यासाठी म्हणून एकांतवास स्वीकारला. आणि श्रीमाताजींनी आश्रमवासीयांच्या आंतरिक व बाह्य जीवनाची जबाबदारी स्वीकारली. अशा प्रकारे श्रीअरविंद–आश्रमाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

हे या घटनेचे शंभरावे वर्ष आहे. या निमित्ताने 'अभीप्सा' मासिकाचा हा विशेषांक प्रकाशित करताना समाधान होत आहे.

संपादक, अभीप्सा मासिक

**

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

योगी श्रीअरविंद म्हणजे पूर्वाश्रमीचे क्रांतिकारक अरविंद घोष आणि श्रीमाताजी म्हणजे पूर्वाश्रमीच्या मीरा अल्फासा, (फ्रान्स). 'श्रीअरविंद आश्रम' हा भारताच्या पूर्व किनाऱ्यावर पाँडिचेरी येथे आहे.

## सिद्धीदिनाची पार्श्वभूमी

(२४ नोव्हेंबर १९२६ हा दिवस विजयदिन किंवा सिद्धीदिन म्हणून ओळखला जातो. आध्यात्मिक इतिहासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण घटना या दिवशी घडून आली म्हणून या दिवसाचे विशेष मोल आहे.

दुःखकष्टमय असलेल्या मानवी जीवनाचे दिव्य जीवनात रूपांतरण व्हायचे असेल तर त्यासाठी अतिमानस अवतरणाची आवश्यकता आहे. आणि अतिमानस (supermind) अवतरित होण्यापूर्वी पूर्वतयारीचा भाग म्हणून जडभौतिकाने अधिमानसिक (overmind) चेतनेचा स्वीकार करण्यास सक्षम होणे आवश्यक होते.

श्रीअरविंद १९०५ सालपासून प्राणायामादी साधना करत होते. पण १९१० साली पाँडिचेरीला कायमस्वरूपी वास्तव्यास आल्यावर, त्यांना अंतर्यामी गुरूने दहा चरणांची साधना सांगितली. आणि येथेच एक प्रकारे पूर्णयोगाचा मार्ग निश्चित झाला. सिद्धीदिनाचे महत्त्व काय होते ते समजून घ्यायचे असेल तर त्याची पार्श्वभूमी आणि श्रीअरविंद त्यासाठी जे परिश्रम घेत होते तेही विचारात घेणे आवश्यक आहे. श्रीअरविंद कोणती साधना करत होते, त्याचे प्रयोजन काय होते, इतर साधनापद्धतींपेक्षा त्या पद्धतीचे वेगळेपण काय होते हे सर्व मुद्दे आपण येथे विचारात घेत आहोत.)

### पूर्णयोगाची आवश्यकता

(श्रीअरविंद यांनी बंधू श्री. बारीन्द्र कुमार यांना एप्रिल १९२० मध्ये लिहिलेल्या पत्रामधील हा अंशभाग...)

मी जेव्हापासून योगसाधनेला आरंभ केला, श्री विष्णू भास्कर लेले यांनी मला योगासंबंधी जे प्राथमिक मार्गदर्शन केले किंवा कारावासात असताना मी जे काही केले ते सारे म्हणजे योगमार्गाचा शोध घेणे होते; इकडे शोध घे, तिकडे शोध घे असे करत त्याच त्या वर्तुळात फिरणे होते; जुन्या आंशिक योगमार्गांना स्पर्श करायचा, त्याचा अंगीकार करायचा, ते पडताळून पाहायचे, त्यांचा अनुभव घ्यायचा, कमी–अधिक प्रमाणात

तिला विश्वाचे कोडे उलगडणे शक्य नाही. ज्यामध्ये स्व आणि विश्व, आत्मा आणि जीवन अशा द्वैताचा समावेश असतो ते वैश्विक अज्ञान, अतिमानसिक स्तरावर चढून गेल्यावरच संपुष्टात येते. त्यानंतर मग त्या व्यक्तीला विश्वाकडे माया म्हणून पाहण्याची आवश्यकता भासत नाही कारण त्या व्यक्तीच्या दृष्टीने आता, हे विश्व म्हणजे ईश्वराची शाश्वत लीला आणि आत्म्याचे क्रमाक्रमाने होत जाणारे आविष्करण असते. अशा वेळी मग, ईश्वराला पूर्णतया जाणणे आणि त्याचा साक्षात्कार करून घेणे किंवा गीतेमध्ये म्हटल्याप्रमाणे, ईश्वराला समग्रतया जाणणे आणि ईश्वरामध्ये पूर्णतः प्रविष्ट होणे शक्य होते.

**विश्वरचना आणि चेतनेचे विविध स्तर**




**पूर्णयोगाची मूलभूत संकल्पना**

शरीर, प्राण, मन व तर्कबुद्धी, अतिमानस आणि आनंदमय अस्तित्व हे आत्म्याचे पाच स्तर आहेत. जसजसे आपण उन्नत होतो, तसतशी मानवाच्या आध्यात्मिक उत्क्रांतीच्या सर्वोच्च पूर्णत्वाची स्थिती जवळजवळ येत जाते.

शंका, प्रश्न अगदी बिनदिक्कतपणे श्रीअरविंदांना विचारत असत. श्रीअरविंदेखील अगदी मोकळेपणाने त्याची उत्तरे देत असत. आणि या चर्चांच्या ओघामध्ये सहजसोपेपणाने, अगदी गहन तात्त्विक विचारांचे स्पष्टीकरण मिळून जात असे. तर कधी श्रीअरविंदांच्या मुखातून त्यांच्या जीवनातील घटनाप्रसंगाचा खुलासा साधकांना सहज मिळून जात असे. कधी दिलखुलास गप्पागोष्टी, हास्यविनोद असे स्वरूपही या सायंकालीन चर्चांना येत असे. त्यातील निरोदबरन यांनी कथन केलेला हा अंशभाग...)

१५ ऑगस्ट १९२६ रोजी श्रीअरविंद यांच्यासोबत झालेले संभाषण

पहिला साधक : तुम्ही जे करू पाहात आहात त्यासंबंधीच्या या वेळच्या प्रयत्नांच्या यशस्वितेबाबत तुम्ही काय म्हणाल? गेल्या वेळेला तुम्ही म्हणाला होतात की, तुम्हाला त्याविषयी खात्री आहे.

श्रीअरविंद : मला खात्री आहे, असे मी म्हणालो नव्हतो. मी काय म्हणालो होतो त्याविषयीची माहिती आपण 'क्ष' कडून घेऊ.

दुसरा साधक (पहिल्या साधकाला उद्देशून) : तुम्ही हा प्रश्न अशा पद्धतीने का मांडला आहे? तुम्ही गतकाळाचा कोणताही संदर्भ न देता हा प्रश्न नव्याने मांडू शकता.

पहिला साधक : सध्याची एकंदर परिस्थिती पाहता, तुम्हाला खात्री वाटते किंवा नाही, हे तुम्ही सांगू शकणार नाही का?

श्रीअरविंद : मला खात्री आहे आणि नाही देखील.

पहिला साधक : म्हणजे काय?

श्रीअरविंद : तत्त्वतः मला खात्री आहे पण व्यवहारतः तसे होईलच याची खात्री नाही, एवढेच मी म्हणू शकतो. व्यवहारतः मी खात्री देऊ शकत नाही कारण हे भौतिक जग पश्चात्ताप–रहित आहे.

पहिला साधक : पश्चात्ताप–रहित आहे, म्हणजे काय?

श्रीअरविंद : ईश्वर असला काय आणि नसला काय, किंवा दिव्य जीवन असले काय आणि नसले काय, त्यामुळे भौतिक जगाला काडीमात्र

## सप्तचतुष्टयाची साधना

(श्रीअरविंद १९०५ सालापासून प्राणायामाची साधना करत होते. नंतर श्री. विष्णू भास्कर लेले यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना अवघ्या तीन दिवसांत निर्वाणप्राप्ती झाली. पुढे अलिपूर तुरुंगात असताना त्यांना 'वासुदेवम् सर्वम् इति'चा साक्षात्कार झाला.

१९१० साली श्रीअरविंद पाँडिचेरी येथे कायमस्वरूपी वास्तव्यास आले. तेव्हा त्यांना त्यांच्या आंतरिक गुरूकडून 'सप्तचतुष्टयाची साधना' नेमून देण्यात आली. १६ जानेवारी १९१२ ला श्रीअरविंदांनी केलेल्या एका नोंदीमध्ये चतुष्टयाचा उल्लेख प्रथमतः आला आहे.

२० नोव्हेंबर १९१३ रोजी श्रीअरविंदांनी सप्तचतुष्टयाचे संपूर्ण लेखन केले असल्याचे त्यांनी केलेल्या नोंदींवरून लक्षात येते. बारीन्द्र कुमार यांना लिहिलेल्या पत्रात श्रीअरविंदांनी याच साधनेचा उल्लेख केला आहे. चार घटकांचा एक समूह म्हणजे चतुष्टय, अशी सात चतुष्टयं म्हणजे एकूण अठ्ठावीस घटकांचा या साधनापद्धतीमध्ये समावेश आहे.

श्रीअरविंदांना साधनाकाळात आलेले अनुभव, त्यांना प्राप्त झालेले ज्ञान या सगळ्याच्या तपशीलवार नोंदी त्यांनी 'रेकॉर्ड ऑफ योग'मध्ये नमूद करून ठेवल्या आहेत. या ग्रंथामध्ये श्रीअरविंदांनी सप्तचतुष्टयाचे सविस्तर विवेचन केले आहे. या सर्व नोंदी त्यांनी स्वतःच्या अभ्यासासाठी केल्या होत्या. कालांतराने या नोंदींच्या आधारे, साधकांना उपयुक्त ठरेल असे लिखाण त्यांनी केले. ते सिंथेसिस ऑफ योग (योगसमन्वय) या ग्रंथात शब्दबद्ध करण्यात आले. श्रीअरविंदांनी ही जी साधना केली त्याची काहीशी कल्पना यावी म्हणून सप्तचतुष्टयापैकी आधारसिद्धी अंतर्गत समाविष्ट असणाऱ्या चार चतुष्टयांची आकृतीबद्ध मांडणी पृष्ठ क्रमांक १६ व १७ वर दिली आहे. पृष्ठ क्रमांक १५ वर नमूद केलेला चतुष्टयाचा क्रम हा 'स्वाभाविक आणि तर्कसंगत' असल्याचे श्रीअरविंदांनी नमूद केले आहे.)

# सिद्धीदिनाचे महत्त्व

## विजयदिन

२४ नोव्हेंबर १९२६ या दिवशी घडलेल्या एका अतिशय महत्त्वपूर्ण आध्यात्मिक घटनेच्या स्मृतिप्रीत्यर्थ २४ नोव्हेंबर हा दिवस 'विजयदिन' म्हणून ओळखला जातो.

– श्रीमाताजी (CWM 13 : 106)

*

## श्रीकृष्णाचे अवतरण

(२४ नोव्हेंबर १९२६ या दिवशी श्रीकृष्णाचे श्रीअरविंदांमध्ये जे अवतरण झाले त्याची हकिकत श्रीमाताजी येथे सांगत आहेत.)

श्रीअरविंद जेव्हा देहात होते तेव्हाचे दिवस मला आठवत आहेत. मी तेव्हा खाली असणाऱ्या कक्षामध्ये ध्यानासाठी जमलेल्या लोकांबरोबर ध्यान करण्यासाठी जात असे.

तेथील खांबावर एक फळी होती, तेथे शिव, कृष्ण, लक्ष्मी, त्रिमूर्ती, सर्व देवदेवता बसत असत. लहानथोर सर्व देवदेवता अगदी नियमितपणे, रोज ध्यानाला येत असत. हे दृश्य मोठे मनोरम असे. परंतु त्यांच्यामध्ये परमेश्वराबद्दल भक्तीची भावना नव्हती. त्यांच्यासाठी भक्ती या संकल्पनेचा काहीच उपयोग नव्हता. प्रत्येकाला स्वतःच्या जीवनपद्धतीमध्ये, स्वतःच्या चिरंतन दिव्यत्वाची पूर्ण जाणीव असे आणि आपण प्रत्येक जण इतर देवदेवतांचे प्रतिनिधित्व करू शकतो याचीदेखील त्यांना जाण होती. (लोकप्रिय, सर्वसामान्यांमध्ये प्रचलित असणाऱ्या उपासनेचा हाच आधार होता आणि त्यांना ते माहीत होते.)

आपण सारे मिळून एक प्रकारचा समुदाय आहोत याची त्यांना जाणीव होती, परंतु आंतरात्मिक जीवन ज्या प्रकारची गुणवैशिष्ट्ये प्रदान करू शकते ती गुणवैशिष्ट्ये त्यांच्यामध्ये नव्हती. म्हणजे त्यांच्यामध्ये सखोल प्रेम, गाढ सहानुभूती, ऐक्यभावना हे काहीच नव्हते. त्यांना फक्त

त्यांच्या 'स्वतःच्या' दिव्यत्वाची जाण होती. आणि प्रत्येक जण त्याच्या स्वतःच्या विशिष्ट प्रतिनिधित्वावर पूर्णपणे समाधानी असायचा. कृष्ण मात्र या सर्वांपेक्षा वेगळा होता.

१९२६ साली मी एक प्रकारच्या अधिमानसिक सृष्टीच्या निर्मितीला सुरुवात केली होती, म्हणजे मी 'अधिमानस' (Overmind) या पृथ्वीवर, जडद्रव्यामध्ये उतरविले होते. (याच सुमारास चमत्कार आणि तत्सम सर्व गोष्टी घडू लागल्या होत्या.)

(श्रीमाताजी ध्यान करत असत तेव्हा तेथे शिव, कृष्ण, लक्ष्मी, त्रिमूर्ती इत्यादी देवदेवता उपस्थित असत.) मी या देवदेवतांना अवतरित होण्याची, एखाद्या देहाशी एकाकार होण्याची विनंती केली होती. त्यातील काहींनी त्यासाठी पूर्णपणे नकार दिला. मी माझ्या स्वतःच्या डोळ्यांनी कृष्णाला पाहिले; त्याचा श्रीअरविंदांशी नेहमीच सुसंवाद चालत असे, त्याने त्यांच्या देहामध्ये अवतरित होण्यास होकार दिला. तो दिवस होता २४ नोव्हेंबर! (ज्या दिवशी माताजींना 'मदर' असे संबोधण्यात येऊ लागले तो हाच दिवस होता.)

## श्रीकृष्णाने दिलेली संमती

कृष्णाने श्रीअरविंदांच्या देहामध्ये अवतरित होण्यास संमती दर्शविली होती; म्हणजे त्यांच्या देहामध्ये स्थायी स्वरूपात राहण्याची संमती दर्शविली होती. लक्षात घ्या की, एक प्रभाव या भूमिकेतून कृती करणे म्हणजे येऊन जाऊन असणे, एखाद्या व्यक्तीच्या अवतीभोवती वावर असणे आणि एखाद्या देहामध्ये अवतरित होऊन तेथे स्थायी स्वरूपात राहण हयामध्ये खूप मोठा फरक असतो. या देवदेवता नेहमीच इकडेतिकडे वावरत असतात. आपणसुद्धा आपल्या आंतरिक जीवनामध्ये एकाच वेळी हजारो ठिकाणी ये–जा करत असतो, कृती करत असतो. त्यामुळे नैमित्तिक येणे–जाणे आणि एखाद्या देहाशी स्वतःला स्थायी स्वरूपात बांधून घेण्यास मान्यता देणे यामध्ये फरक असतो. म्हणजे चिरस्थायी

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# सिद्धींचे प्रदर्शन

ही एका योग्याची गोष्ट आहे. त्याला बऱ्याच अद्भुत सिद्धी लाभलेल्या होत्या. त्याच्या शिष्यांनी त्याला एकदा भोजनासाठी आमंत्रित केले होते. एका मोठ्या टेबलावर भोजनाची व्यवस्था केलेली असते. 'आम्हाला तुमच्या सिद्धींचा चमत्कार दाखवाल का,' अशी विनंती शिष्यगण त्याला करतात. अशा रितीने सिद्धींचा वापर करणे योग्य नाही, हे त्या योग्याला माहीत होते. पण त्याच्या आतमध्ये कोठेतरी महत्त्वाकांक्षेचे बीज दडलेले होते.

त्याने असा विचार केला की, ''खरं तर ही अगदी साधीशीच गोष्ट आहे; मी चमत्कार करून दाखविला तर त्यामुळे अशा गोष्टी करणे शक्य असते हे शिष्यांना कळेल आणि त्यातून मी त्यांना ईश्वराची महती पटवून देऊ शकेन. तेव्हा असे करायला काहीच हरकत नाही.''

त्याने शिष्यांना सांगितले की, ''फक्त हे समोरचे टेबल खालच्या खाली काढून घ्या. पण फक्त हे टेबलच हं. त्यावर आच्छादलेले वस्त्र तसेच राहू दे, त्याच्यावर ठेवलेली ताटंवाट्या देखील तशाच राहू देत.'' त्या शिष्यांनी त्याने सांगितले होते अगदी तसेच केले.

आणि काय आश्चर्य! ते टेबल बाजूला काढले तरी, ते वस्त्र आणि त्यावर असलेल्या सगळ्या गोष्टी जशाच्या तशा त्याच जागेवर राहिल्या होत्या. त्या गोष्टी अधांतरी राहिलेल्या पाहून शिष्यांना आश्चर्य वाटले. पण मग मात्र तो योगी भानावर आला आणि आकांत करत म्हणू लागला, ''माझा धिक्कार असो. मी माझ्या देवाशी प्रतारणा केली आहे.'' त्याचे अंतःकरण पश्चात्तापाने पोळू लागले. त्याने दैवी शक्तीचा वापर स्वतःच्या स्वार्थासाठी केला होता.

सिद्धींचे असे प्रदर्शन करणे नेहमीच अयोग्य असते. सिद्धींचा काही उपयोगच नसतो, असा त्याचा अर्थ नाही. मात्र, सिद्धी ज्या कारणासाठी प्राप्त झालेल्या असतात, त्यासाठीच त्यांचा उपयोग केला गेला पाहिजे. म्हणजे असे की, ईश्वराशी एकत्व पावल्यामुळे त्या सिद्धी प्राप्त झालेल्या असतात; त्यामुळे त्यांचा उपयोग ईश्वरी इच्छेनुसारच झाला पाहिजे, प्रदर्शनासाठी त्यांचा वापर करता कामा नये.

– श्रीमाताजी (CWM 03 : 07-08)

*